जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८२ दिनांक - ३१/०१/२०२४**

पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर

# एम.पी.डी.ए.कायद्यांतर्गत स्थानबध्द कारवाईचे पुणे पोलीस आयुक्तांचे शतक, केवळ ०१ वर्षाच्या कालावधीत ऐतिहासिक कामगिरी

### हडपसर पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर

### मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची १०० वी कारवाई

पुणे पोलीस आयुक्तालयातील हडपसर पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे- **राजु हनुमंत गायकवाड, वय.३९ रा. लेन नं.०७ कॅनॉल शेजारी,गंगानगर, हडपसर पुणे.** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने हडपसर पोलीस स्टेशनच्या हद्दीत गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ४ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ७ गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. रितेश कुमार यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह,कोल्हापुर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.**नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र शेळके,व पी.सी.बी. गुन्हे शाखाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.चंद्रकांत बेदरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाचक शाखा श्री. गजानन पवार,पी.सी.बी गुन्हे शाखे कडील पोलीस उप निरीक्षक राजु बहिरट,सहा.पोलीस उप निरीक्षक,शेखर कोळी,सहा.पोलीस उप-निरीक्षक,वाचक शाखा, दिलीप झानपुरे, पोलीस अंमलदार, योगीराज घाटगे,अविनाश सावंत,संतोष कुचेकर,सागर बाबरे,अनिल भोंग यांनी सदरची कामगिरी पार पाडलेली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन, शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल,यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिलेले आहेत.

**मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतर दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेच्या ०१ वर्षाचे कालावधीमध्ये एकूण १०० कारवाया केलेल्या आहेत. त्यामध्ये एकूण १०० आरोपींना महाराष्ट्र राज्यामधील विविध कारागृहा मध्ये स्थानबध्द करण्यात आलेले आहे.**

पुणे पोलीस आयुक्तालयाचे इतिहासामध्ये प्रथमच इतक्या कमी कालावधीमध्ये अशा स्वरुपाची प्रभावी कारवाई झाली आहे. यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.